

# गर्भाशयमुख कॅन्सर

**पॅप स्मिअर ही चाचणी दर पाच वर्षांनी करून घ्यावी. खालील स्वरूपाची लक्षणे असल्यास ही चाचणी लागलीच करून घ्यावी. आपल्या कुटुंबात या व्याधीचा इतिहास असल्यास किंवा पूर्वी संक्रमण झाले असल्यास ही चाचणी पाच वर्षांपेक्षा कमी कालावधीत करून घेता येऊ शकते.**

पुढारी आरोग्य
११ जून २०१५
पान नं. ७

वैद्य सौ. विनिता बेंडाळे

स्त्री या शब्दात संतुलनाची शक्ती दडलेली आहे. स्वतःचे, कुटुंबाचे, नात्यांचे, आव्हानांचे, घर व काम यातील कसरतीचे संतुलन साधून घराला, समाजाला पूर्णत्व देण्याचे काम कार्य शतकानुशतके स्त्री करत आहे. आज स्त्री-पुरुष समानतेला मागे टाकून स्त्रियांनी अनेक क्षेत्रात पुढे पाऊल टाकले आहे. याचा समाजाला अभिमान आहे. परंतु, प्रश्न जेव्हा स्त्रीच्या आरोग्याचा किंवा स्त्रियांच्या आरोग्यविषयक प्राथमिक गरजांचा येतो तेव्हा आपण एक पाऊल मागे जातो. कारण, आजही अनेक स्त्रियांना आपल्याला होत असलेल्या स्त्री-रोगांबद्दल बोलायला, सांगायला अवघडल्यासारखे वाटते. हे अवघडलेपण एखाद्या स्त्रीला कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराकडे नेत असेल तर?

गर्भाशय हे स्त्रीला निसर्गाने दिलेले वरदान आहे. हा अवयव स्त्रीला पूर्णत्व देतो. तुम्हास माहीत आहे का? गर्भाशयमुखाचा कॅन्सर हा जगातील ५ प्रमुख कर्करोगांपैकी एक आहे? जगात दरवर्षी सुमारे ५,१०,००० रुग्णांचे निदान या आजाराने होते. त्यातील २,८८,००० रुग्ण मृत्युमुखी पडतात. भारतात १,३२,००० रुग्णांचे गर्भाशयाचा कॅन्सर या व्याधीने निदान होते. त्यापैकी सुमारे ७४,००० रुग्ण या कॅन्सरने मृत्युमुखी पडतात. हे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. गर्भाशयमुख कॅन्सर या आजाराने मृत्यू पावणाऱ्या रुग्णांपैकी एक तृतीयांश रुग्ण हे भारतातील आहेत. यावरून या आजाराची गंभीरता लक्षात येऊ शकते.

रोगाचे निदान झाल्यावर 'मलाच का? किंवा मीच का?' हा प्रश्न रुग्ण विचारतो. या प्रश्नाचे उत्तर, 'योनीमार्गातून श्वेत स्राव होणे, मासिक रजस्राव नसताना किंवा संभोग झाल्यावर योनीमार्गातून होणारा रक्तस्राव इत्यादी पूर्वरूपात आहे. एकतर दुर्लक्ष किंवा ही पूर्वरूपे सांगण्यास वाटणारा अवघडलेपणा यामुळे रोगाचे निदान लवकर होत नाही. त्यामुळे प्राथमिक अवस्थेचे रूपांतर दुर्धर अशा गर्भाशयमुख कॅन्सर या व्याधीत होते. याने स्त्रीचे आरोग्य व आयुष्य धोक्यात येते. असे होऊ नये, यासाठी गर्भाशयमुख कॅन्सरबाबत खालील माहिती निश्चित उपयुक्त ठरू शकते.

**व्याधीचे कारण :** ह्युमन पॅपिलोमा व्हायरस (HPV) नावाच्या विषाणूच्या संक्रमणामुळे हा आजार होतो, असे आढळते. या विषाणूचे संक्रमण त्वचेवरील जखम, संक्रमित व्यक्तीशी असुरक्षित यौनसंबंध इत्यादी कारणांमुळे होऊ शकते.

**व्याधीची लक्षणे :**

१. मासिक पाळीच्या दरम्यान किंवा नंतर योनीमार्गातून कमी स्वरूपाचा रक्तस्राव (स्पॉटिंग)

२. मासिक पाळीच्या वेळी किंवा नंतर अत्याधिक रक्तस्राव

३. संभोगानंतर योनी किंवा ओटीपोटी प्रदेशी वेदना

४. रजोनिवृत्तीनंतर, योनी मार्गातून कमी किंवा अधिक स्वरूपाचा रक्तस्राव

**आवश्यक निदान चाचण्या :**

१. या व्याधीचे खात्रीशीर निदान व्हावे, यासाठी पॅप स्मिअर (Pap Smear) ही चाचणी उपलब्ध आहे. या चाचणीसाठी गर्भाशयमुखातील थोडासा भाग हा यंत्राच्या साहाय्याने खरवडून काढला जातो, त्याचे परीक्षण करण्यात येते. ही चाचणी दर पाच वर्षांनी करून घ्यावी. वरील स्वरूपाची लक्षणे असल्यास ही चाचणी लागलीच करून घ्यावी. आपल्या कुटुंबात या व्याधीचा इतिहास असल्यास किंवा पूर्वी संक्रमण झाले असल्यास ही चाचणी पाच वर्षांपेक्षा कमी कालावधीत करून घेता येऊ शकते.

२. HPV साठी चाचणी

३. सोनोग्राफी

**उपलब्ध उपचार पद्धती :**

गर्भाशयमुख कॅन्सरवरील उपचार हा कॅन्सरच्या अवस्थेवर अवलंबून असतो. अवस्था निश्चितीसाठी शोथ किंवा गाठीची व्यापकता व कॅन्सर इतर अवयवात किती पसरला आहे किंवा नाही यावर अवलंबून असते.

**प्राथमिक अवस्था :** हा कॅन्सर फक्त गर्भाशयमुखाशी संबंधित असतो. अशा स्थितीत रुग्ण आढळल्यास शल्यचिकित्सेद्वारा गर्भाशयमुख किंवा संपूर्ण गर्भाशयाचे निर्हरण केले जाते व त्यासोबत रेडिओ थेरपी किंवा केमो थेरपी घेण्याचा सल्ला दिला जातो.

**इ. पुढील अवस्था :** या अवस्थेत कॅन्सर हा गर्भाशयमुखसमवेत जवळच्या भागात किंवा इतर अवयवात पसरलेला असतो. गर्भाशयमुखाचा कॅन्सर इतर अवयवात पसरण्याची संभावित स्थाने - गर्भाशयमुख कॅन्सर प्राथमिक किंवा आरंभिक अवस्थेत असताना उपचार न घेतल्यास, कॅन्सर हा योनीमार्ग, मलाशय, मूत्राशय तसेच गर्भाशयाचे स्नायू या अवयवात पसरू शकतो. अशा परिस्थितीत रेडियेशन व केमो थेरपी यांचा प्राधान्याने उपयोग केला जातो. तसेच शल्यचिकित्सेद्वारा ज्या अवयवात कॅन्सर पसरला आहे त्यानुसार शस्त्रक्रिया करण्यात येते.

**गर्भाशयमुख कॅन्सर व आयुर्वेद**

आयुर्वेदाचा गर्भाशयमुख कॅन्सरकडे पाहण्याचा दृष्टिकोन अतिशय सूक्ष्म व शास्त्रीय आहे, कॅन्सर होऊ नये म्हणून पूर्वरूप अवस्थेतच प्रतिबंधात्मक उपाययोजना व कॅन्सर झाल्यास त्याची अगदी शास्त्रशुद्ध चिकित्सा अशा स्वरूपाचा विचार केला जातो.

गर्भाशयमुख कॅन्सर हा काही एक किंवा दोन दिवसात होणारा व्याधी नाही. तर योनी व गर्भाशयमुख येथे स्थानिक बदल बऱ्याच काळापासून होत राहतात व त्याकडे दुर्लक्ष केल्यास किंवा योग्य ती चिकित्सा न घेतल्यास त्याचे रूपांतर पुढे जाऊन गर्भाशयमुख कॅन्सर यात होते. अशा स्वरूपाच्या लक्षणांना पूर्वरूप म्हणतात. म्हणजेच व्याधी अव्यक्त स्वरूपात असतानाची लक्षणे. यात गर्भाशयमुखी शोथ व जंतुसंसर्ग ही प्रमुख दोन पूर्वरूपे होत.

गर्भाशयमुखी शोथ व जंतुसंसर्ग अशा स्थितीत रुग्ण असल्यास काही निदनात्मक चाचण्या केल्या जातात यात पॅप स्मिअर (Pap Smear) ही महत्त्वाची चाचणी होय. यासोबत सोनोग्राफी ही तपासणीसुद्धा करण्यात येते. यात जर गर्भाशयमुखाच्या ठिकाणी शोथ असल्यास त्या ठिकाणातील संक्रमण रोखणे फार गरजेचे असते. यासाठी खालील प्रतिबंधात्मक उपाय केले जातात.

**प्रतिबंधात्मक उपाय**

१. योनीधावन : यात विविध औषधीयुक्त काढ्यांनी योनीमार्गाचे धावन केले जाते. यामुळे योनीमार्ग व गर्भाशयमुख येथील रोग प्रादुर्भाव कमी होऊन योनीमार्गातील

स्रावांचे प्रमाण योग्य राखले जाते.

२. योनी पिचू : औषधी तेल किंवा तुपामध्ये भिजवलेला निर्जंतुक कापूस योनीमार्गात ठेवला जातो. योनीमार्ग व गर्भाशयमुखाच्या श्लेष्मल कलेतून या औषधांचे शोषण होऊन स्थानिक व सार्वदेहिक बल देण्याचे कार्य यामुळे होते. योनीधावनानंतर पिचू असा क्रम सांगितला आहे.

योनीधावन व पिचू या दोन्हीमुळे गर्भाशयमुखाच्या ठिकाणी वारंवार होणारा रोग प्रादुर्भाव कमी होतो व परिणामी गर्भाशयमुख शोथ, अंगावरून पांढरे जाणे, योनिभागी कंडू, वेदनायुक्त संभोग इत्यादी तक्रारी कमी होतात. म्हणून पूर्वरूप अवस्थेत आवश्यकतेनुसार, तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार योनीधावन, पिचू व सोबत काही औषधांचे सेवन फारच परिणामकारक दिसून येते. या उपायांनी आपण अव्यक्त अवस्थेतच प्रतिबंध करून त्याचे कॅन्सरमध्ये होणारे रूपांतर टाळू शकतो.

**२. कॅन्सरचे निदान झाले असल्यास :**

गर्भाशयमुखाचा कर्करोग झाला असल्यास USG, CT scan, MRI, PET scan इत्यादी नैदानिक परीक्षणे करण्यात येतात. यानंतर रसायन चिकित्सेचा अवलंब करण्यात येतो. रसायन चिकित्सा कॅन्सरच्या पेशींना कृत्रिमरीत्या न मारता त्यांचा नैसर्गिक मृत्यू घडवून आणते व कॅन्सर आटोक्यात आणण्यात मदत करते. त्यामुळे रसायन हे सरळ कॅन्सरच्या गाठीवर कार्य करून त्याची नैसर्गिक वाढ थांबवते. रसायन चिकित्सा कॅन्सर पेशींचा इतर अवयवातील प्रसार होणे थांबवतात व रुग्णाचे शारीरिक व मानसिक बळ वाढवण्यास बदल करतात.

**प्राथमिक स्वरूपात चिकित्सेचे महत्त्व :** आधी सांगितल्याप्रमाणे पूर्वरूप अवस्थेतच योग्य ती चिकित्सा घेतल्याने केन्सरसारख्या भयानक आजारापासून सुरक्षित राहू शकतो. रुग्णास होणाऱ्या शारीरिक व मानसिक वेदनांपासून बचाव करू शकतो.

भारतामध्ये प्राथमिक स्वरूपात आजाराचे निदान का अवघड आहे?

१. भारतीय महिला या स्वभावाने सोशिक व काटक असतात. म्हणून बरेचदा ही लक्षणे दिसूनसुद्धा त्याकडे मासिक पाळीचा त्रास म्हणून दुर्लक्ष करून दुखणे अंगावर काढले जाते.

२. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे, आजार हा अव्यक्त किंवा पूर्वरूपात म्हणजे आजाराचे स्वरूप गर्भाशयमुखाशी असणारा जंतुसंसर्ग व सूज या स्वरूपात असताना नेमके काय करावे, कोणत्या स्वरूपाची चिकित्सा घ्यावी, याविषयी माहिती रुग्णांना नसते.

वेळीच योग्य पावले उचलली असताना, पुढे कॅन्सरसारखी भयानक व्याधी टाळता येऊ शकते, ही माहिती जनसमुदायात होणे ही आजच्या काळाची नितांत गरज आहे. जगातून कॅन्सर चे उच्चाटन करण्याचे निसर्गविरोधी ध्येय बाळगण्यापेक्षा, तो होऊच नये याकरिता सुयोग्य व निसर्गसुसंगत जीवनशैलीचा पुरस्कार करणे तसेच दुर्दैवाने झालाच तर त्याच्याशी खंबीरपणे मुकाबला करण्याचे धैर्य रुग्णात बाणवणे. अशाप्रकारे रुग्णाच्या आयुष्याचा दर्जा सुधारून तिचे आयुष्य वाढविणे हेच या चिकित्साप्रणालीचे व विचाराचे सूत्र आहे. ■■